Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 3, Sept 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

महिलांचे राजकीय आरक्षण धोरण आणि सक्षमीकरण

कैलास सोनवणे

(राज्य शास्त्र विभाग)
हुतात्मा राजगुरू महविदयालय, राजगुरूनगर

प्रस्तावनाः—

भारतीय राजकीय प्रक्रियेत आरक्षणाचे धोरण हे दलित व मागास समुहाच्या राजकीय सहभागाचे एक महत्वपुर्ण साधन म्हणुन स्विकारण्यात आले. लिंग, जात, वर्ण, इ.भेदभावामुळे वंचित राहिलेल्या समाज घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विधायक भेदभावाचे सुत्र स्विकारले गेले. याच सुत्रानुसार महिला आरक्षणाची चर्चा आपणांस करता येईल.

भारतीय राज्यघटनेने कलम १४ द्वारे स्त्री—पुरूष समानता मानली आहे. त्यामुळे स्त्रियांनाही मतदानाचा आणि निवडणुका लढविण्याचा अधिकार मिळाला म्हणजेच भारताच्या राज्यघटनेने स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने राजकीय हक्क दिले पण हे हक्क वापरण्यासाठीची परिस्थिती मात्र अनुकूल नाही. आर्थिक विषमता, स्त्री—पुरूष भेद, सर्वच क्षेत्रातील पुरूषी वर्चस्व आणि सर्वस्वी असलेली कौटुंबिक जबाबदारी यामुळे स्त्रियांना हे हक्क बजावणं षक्य होत नाही. ही वस्तुस्थिती स्त्रियांना राजकारणापासुन दुर ठेवते. त्यामुळे स्त्रियांचा राजकीय सहभाग नगण्य दिसतो. पण आज षिक्षणामुळे, चळवळीतील अनुभवामुळे, नव्या भांडवली समाजातील वाढत्या गरजांमुळे स्त्रियांमध्ये एक वेगळी जागृती निर्माण झाली. त्यांचा आत्मविष्वास वाढला. दुय्यम स्थानाची चीड आणि हक्कांची जाणीव निर्माण झाली. बदलत्या आर्थिक परिस्थितीमुळे, सामाजिक सुधारणांच्या रेटयामुळे आणि १९७५ नंतरच्या स्त्री चळवळीच्या वाढत्या जोरामुळे स्त्रियांच्या राजकीय हक्कांबद्दलची, त्यांच्या प्रत्यक्ष सहभागाविशयीची जाणीव वाढली व याची परिणीती १९९२ मध्ये ७३,७४ व्या घटना दुरूस्तीने राजकीय निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग महत्वपुर्ण मानण्यात झाला. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांसाठी आरक्षण जाहिर करण्यात आले. स्त्री प्रष्नांना राजकीय चौकटीत मान्यता देणारे हे महत्वपुर्ण पाऊल होते. स्त्रियांचे प्रष्न व दृष्टीकोन यांना निर्णय प्रक्रियेत स्थान मिळावं हा या मागचा हेतु होता. या विधेयकानं देशभरातील दहा लाखाच्या वर स्त्रियांना पंचायत राज्यव्यवस्थेमध्ये आणलं. एरवी ग्रामपंचायतीच्या आसपास फिरण्याचं स्वप्नही ज्यांना कधी पाहता आलं नसतं, त्यांना या विधेयकामुळे गावातल्या सत्तेत प्रत्यक्ष हक्काचा वाटा मिळाला. महिला आरक्षणाची ही सकारात्मक बाजु अतिशय चांगली आहे. मात्र आज असेच चित्र सगळीकडे दिसत आहे का?महिलांना सत्ता मिळाली परंतु अधिकार मिळाले का?त्यांचे ख—या अर्थाने राजकीय सबलीकरण झाले का?असे अनेक प्रष्न जेव्हा चर्चेला येतात तेव्हा आपणास वरवर आदर्शवत वाटणा—यास राजकीय प्रक्रियेच्या अंतरंगात वेगळेच चित्र महिलांच्या राजकीय सहभागासंदर्भात समोर येते की, जे अजुनही ''राजकारण हे स्त्रियांचे क्षेत्र नव्हे'' असेच कथन करताना दिसत आहे. म्हणजेच महिलांना राजकीय प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांना राजकीय हक्क व अधिकार नाकारणे असे जर घडत असेल तर त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. याचसाठी संबंधित षोध निबंधात महिला आरक्षण, महिलांचा राजकीय सहभाग, राजकीय सहभागाची परिणामकारकता व सध्यस्थिती आणि सबलीकरण यावर भाश्य केले जाणार आहे.

महिलांच्या राजकीय सहभागाचा पुर्व इतिहास :—

प्राचीन काळापासुन ज्या स्त्रियांना राजकारणात भाग घेण्याची संधी मिळाली त्यांनी राजकारणात आपला ठसा उमटविलेला दिसतो. महाराष्ट्राच्या इतिहासात शककर्ता षालिवाहन याची आई गौतमी किंवा चांदबिबीसारख्या मोजक्याच स्त्री राज्यकर्त्यांची नावे

Please cite this Article as : *कैलास सोनवणे , महिलांचे राजकीय आरक्षण धोरण आणि सक्षमीकरण* **: Golden Research Thoughts (Sept ; 2012)**

आढळुन येतात. मध्ययुगीन मराठी समाजात स्त्रियांच्या कर्तृत्वाला मान दिल्याचे आढळुन येते. महाराष्ट्रात राजकीय धुरंधर स्त्रियांच्या परंपरेला जिजाबाईपासुनच सुरूवात होते. राज्यकारभारात जिजाबाई कुशल होत्या. षिवाजी आग्र्याला औरंगजेबाच्या कैदेत असताना जिजाबाईंनी राज्याची सर्व जबाबदारी सांभाळली. त्यानंतर शिवाजींच्या सुना येसुबाई व ताराबाई यांनी मराठयांचे राज्य सावरून धरले. ताराबाईंनीच मराठयांची दृश्टी दिल्लीपर्यंत पोहचविली. त्यानंतरच्या काळात म्हणजेच पेशवाईतही अनेक विद्वान स्त्रिया राजकारणात होत्या. पेशव्यांची पहिल्या दर्जाची सरदारकी त्यांनी सांभाळली, अनुबाई घोरपडे, उमाबाई खंडेराव दाभाडे, अहिल्याबाई होळकर अशा अनेक महिलांनी स्वत:च्या कर्तृत्वाने राज्याचा कारभार सांभाळला. १९ व्या षतकाच्या पुर्वार्धात मराठयांचे राज्य लयास गेल्यानंतर इंग्रजांनी सत्ता काबीज केली. याच काळात राणी लक्ष्माबाई, नागपुरच्या बायजाबाई षिंदे, कोल्हापूरच्या ताईसाहेब राणी सरकार यांनी मोठया धैर्याने इंग्रजी सत्तेला आव्हान दिले व राज्याची धुरा सांभाळली. ब्रिटीष काळात अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्यामध्ये सामाजिक जागृती करून स्वातंत्रलढयात त्यांचा सहभाग वाढविला. महात्मा गांधींनी स्त्री वर्गातली कार्य करण्याची षक्ती जागृत केली. स्त्रियांच्या षक्तिचा व संघटनेचा ओघ राष्ट्कार्याकडे वळवावा म्हणुन मुंबई येथे २७/११/१९९८ ला हिंदु महिला संस्थेची स्थापना केली. स्त्रियांना राजकारणाची माहिती व्हावी व स्वातंत्र्य लढयाचे महत्व पटावे या उद्देषाने अनेक प्रकारच्या संस्था स्थापन केल्या. १९२० पासून स्त्रिया स्वातंत्र्याच्या चळवळीत उतरू लागल्या. राजकीय सभा, सत्याग्रह, निदर्षने, यात सहभागी होऊ लागल्या. १९२० ते १९३० या दषकातील महिलांनी विधायक कार्यक्रमात आपण मागे नाही हे सर्व प्रकारच्या कार्यक्रमात यषस्वीरीत्या भाग घेऊन सिध्द केले. स्वातंत्रोत्तर काळात पक्ष, कायदेमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, कामगार चळवळ यातुन त्यांचे आसतित्व वरचेवर जाणवु लागले.

महिला आरक्षणाच्या मागणीची पुर्वपिठिका:–

भारतात वसाहतवादी काळातील विविध चळवळींच्या वारषामुळे स्वातंत्र्यानंतर स्त्री व पुरूषांना मतदानाचा अधिकार एकाच वेळी प्राप्त झाला. स्त्रियांचा मतदानाचा अधिकार मतदान करण्याच्या पलीकडे जाऊ षकला नाही. राजकारणाचा वारसा लाभलेल्या काही मोजक्या महिलाच राजकीय प्रक्रियेत सहभागी होऊ शकल्या. त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसाही भारतीय राजकारणावर उमटवला. मात्र अशा मोजक्या

स्त्री प्रतिनिधी पलीकडे ही संख्या पुढे जाऊ षकली नाही. याच महिला प्रतिनिधींच्या विरोधामुळे महिला आरक्षणाची चर्चाही पुढे सरकु शकली नाही. १९७५ साली नेमलेल्या कमिटी ऑन दी स्टेटस ऑफ विमेन इन इंडिया या समितीमध्येही महिलांच्या राजकीय सहभागावर चर्चा झाली. मात्र समितीच्या आरक्षणाच्या मागणीस वीणा मुझुमदार आणि लतिका सरकार यांनी असहमती दर्शविली. परिणामी १९८० च्या दषकात स्त्री चळवळींनी सत्ता, राजकारण, आणि राजकीय व्यवस्थेचे पुरूशसत्तावादी विश्लेषण करून स्त्री प्रश्नांना राजकीय आखाडयात आणले. ''खाजगी देखील राजकीय असते.'' ही घोषणा देत कुटुंब व्यवस्थेवरही प्रश्न उपस्थित केले. लोकशाहीतील प्रतिनिधीक संस्थाचे पुरूषसत्ताक वर्चस्व विश्लेषित केले. नागरिकत्वाच्या संकल्पना, कायदे यांची समिक्षा सुरू केली. या रेटयातुन समोर आलेले स्त्रीवादी राजकारण महिला आरक्षणाच्या मागणीस प्रेरणा देणारे ठरले. जहाल स्त्रीवादयांनी मातृत्वालाच नकार देत विवाह संस्था नाकारून भगिनी भावाचा मुद्दा मांडला. त्यामुळे पितृसत्तेला बसलेला हादरा आणि राजकीय सहभागाची आवष्यकता मान्य करायला लावणा–या ठरावामुळे १९८० नंतर विधेयक मंजुरीच्या दृश्टीने प्रयत्न सुरू झाले. स्त्रीवादी राजकारणाने अभिजन महिलांमध्येही राजकीय जागृतीची स्त्रीवादी जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

भारतीय स्त्रीवादी राजकारणाबरोबरच आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेल्या परिशदांमधुन महिलांच्या राजकीय सहभागासाठी आरक्षणाच्या धोरणाची षिफारस केली गेली. अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांनी महिला आरक्षणाचा स्विकार करण्याची षिफारस केली. १९९५ साली बीजिंग येथे चौथी जागतिक महिला परिशद झाली. या परिशदेतही सत्ता संरचनेत आणि निर्णय निर्धारणात महिलांचा अर्थपुर्ण सहभाग असला पाहिजे. असा प्रस्ताव मांडण्यात आला होता. राष्ट्रीय विकास निर्देषांकाचा एक घटक म्हणुन महिलांचा राजकीय सहभाग विचारात घेण्यास प्रारंभ झाला. ही आंतरराष्ट्रीय परिस्थिती व त्यातुन पुढे आलेला दबाव महिला आरक्षण मागणीस पुरक ठरला आहे. महाराश्ट्रात १९९० मध्ये शरद पवार षासनाने स्त्रियांसाठी ३०टक्के राखीव जागांची तरतुद नगरपालिका, जिल्हा परिशद पातळीवर जाहिर केली. आणि भारतात १९९२ साली स्विकारलेल्या ७३,७४ व्या घटना दुरूस्तीमुळे पंचायत राज संस्थांमध्ये स्त्रियांना प्रतिनिधीत्वाचा अधिकार प्राप्त झाला. महिला प्रतिनिधीत्वाच्या इतिहासातील ही एक महत्वपुर्ण क्रांती होती.

73 व 74 वी घटना दुरूस्ती व त्यांची परिणामकारकता:–

स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाही विकेंद्रीकरणाच्या मुख्य राजकीय यंत्रणा मानल्या जातात. वरील दोन्ही घटना दुरूस्तीने या संस्थांना घटनात्मक दर्जा बहाल करण्यात आला. या पुर्वी नियमित निवडणुकांचा अभाव, विशिष्ट जातीचे वर्चस्व असल्यामुळे या संस्था जणु जातपंचायतीची भुमिका पार पाडत होत्या. पण १९९२ साली अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास वर्ग आणि महिलांना आरक्षणाची तरतुद केली गेली. त्यामुळे पंचायत राजसंस्थेला ख–या अर्थाने लोकशाही स्वरूप प्राप्त झाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्रथमच नवा पंचायत राज कायदा आल्यामुळे ग्रामीण भागातील राजकीय चित्र बदलायला लागले. स्थानिक स्वराज्य संस्थांत स्त्रियांचा सहभाग मोठया प्रमाणावर वाढला. संधी मिळताच राजकारणातही स्त्रियांनी आपल्या बुध्दीची चुणूक दाखविली. ग्रामीण भागातील स्त्रिया, आदिवासी किंवा अगदी डोंगराळ भागातील स्त्रियाही राजकारणात सक्रिय सहभाग घेऊ लागल्या. सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, महापौर, अषी मानाची प्रमुख पदही स्त्रियांना मिळाली. गावाचा विकास, पाणी, शाळा, रस्ता, दारूबंदी यासारखे कळीचे विषय महिलांनी पुढे आणले. या महिला प्रतिनिधीत्वाने पुरूशांपेक्षा वेगळा असा विकास कामांचा अजेंडा वापरावयास सुरूवात केली. निधींचा वापर योग्य रितीने करणे, सामाजिक कार्यक्रम राबविणे, नागरीकांच्या दैनंदिन गरजांना प्राधान्य देणे, महिला व बालकांच्या आरोग्याचे प्रष्न, भ्रष्टाचार निर्मुलन अशा महत्वपुर्ण कामांमधुन ग्रामविकास व जनविकासामधुन या महिला प्रतिनिधींनी विषेश कामगिरी करून दाखविली. असे अनेक सकारात्मक बदल या घटना दुरूस्तीने व महिलांच्या राजकीय सहभागाने दिसावयास सुरूवात झाली. मात्र या सकारात्मक परिणामांबरोबरच आपणास वास्तवाचे भान ठेवणे गरजेचे आहे. या घटना दुरूस्तीने जेवढी ठळकपणे परिणामकारकता लक्षात येते तषीच किंवा त्याहीपेक्षा ठळकपणे सद्यस्थिती व वास्तविकता भयावह दिसते. राजकीय

सहभागाच्या कधीही न थांबणा—या एका प्रक्रियेला हया घटना दुरूस्तीने व एकुणच महिला आरक्षण विधेयकाने सुरूवात झालेली आपणास दिसते. हयामुळे राजकीय प्रक्रियेत महिलांना प्रत्यक्ष सत्ता मिळाली. त्यातही महत्वाचे म्हणजे दलित, अदिवासी महिलांना सत्तेपर्यंत पोहचता आले. हे जरी खरे असले तरी सध्यस्थिती अशी दिसते की अनेक स्त्रियांना येथपर्यंत पोहचण्यासाठी अनेक प्रकारे त्रास सोसावा लागला आहे. तसेच अज्ञानामुळे त्यांची फसवणुक करणे, महिलेच्या नावाने नेतृत्व स्वत:कडेच घेणे असे प्रकार घडताना दिसतात. समाजातील जातीव्यवस्थेचा प्रभाव, पितृसत्ताक मानसिकतेमुळे पंचायत राज संस्थांत महिलांचा सहभाग म्हणजे ''जुनीच भुमिका — नवीन उत्तरदायित्व'' अशी अवस्था सध्या पहावयास मिळते. लहान गावातुन समाज व नातेवाईकांची टीका, शारिरीक व श मानसिक त्रास, चारित्र्यहनन यासारख्या मार्गाचा वापर करून अनेक महिला प्रतिनिधींना कोंडीत पकडल्याचे आपणास दिसते. ही वास्तवताही मान्य करावी लागेल. थोडक्यात महिलांना या घटना दुरूस्तीने राजकीय प्रक्रियेत सत्ता मिळाली पण अधिकार व प्रतिष्ठा मिळाली नाही असेच आपणास दिसते.

समारोपः—

लोकशाही विकेंद्रीकरण व्यापक करण्याच्या उद्देशानेच पंचायत राज्यामध्ये ७३ व ७४ वी घटना दुरूस्ती करून महिलांना त्यातही दलित, अदिवासी महिलांना राजकीय प्रक्रियेत व निर्णय निर्धारणात स्थान मिळाले. त्याची परिणामकारकता सकारात्मक अशीच आपणास दिसते. परंतु त्याची वास्तविकता म्हणावी तेवढी चांगली दिसत नाही. महिला प्रतिनिधींना सत्तेबरोबरच अधिकार व प्रतिष्ठाही मिळाली पाहिजे यासाठी जातीव्यवस्थेचा प्रभाव व पितृसत्ताक मानसिकतेमध्ये परिवर्तन होणे अपेक्षित आहे.

महिलांनी आपल्या राजकीय इच्छाषक्तीच्या जोरावर आपले हात असलेले राजकीय खच्चीकरण मोडीत काढले पाहिजे. त्यांनी कुटुंब, समाज, जात, धर्म यांच्याही पलिकडे जाऊन आपल्या नेतृत्वाचा विकास घडवून आणला पाहिजे. कुठेही आणि कोणत्याही बाबतीत स्त्री म्हणुन कमी पडत नाहीत हेच त्यांनी दाखवुन दिले पाहिजे तेव्हाच महिलांचे राजकीय सबलीकरण झाले आहे असे आपणांस म्हणता येईल.

संदर्भग्रंथः—

१)Menon Nivedita (2004): Recovering subversion: feminist politics Beyond the law. Reservations for women: Am I that name? Delhi, permanent Black.
२)Nanivadekar medha (2003): Are Quotas a Good Idea? The Indian Experience with Reserved seats for Woman, EPW, 25 Oct.
३)ज.शं. आपटे, पुष्पा रोडे (२००८), भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड प्रकाशन, पुणे.
४)विद्युत भागवत, स्त्री—प्रष्नाची वाटचाल, (२००४), प्रतिमा प्रकाषन, पुणे.
५)गवाणकर रोहिणी, भारतीय स्त्री षक्तीचे राजकारणी रूप, पुणे.
६)साने गीता, भारतीय स्त्री जीवन (१९८६), मौज प्रकाशन गृह, मुंबई.